# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०९/२०२४ (शनिवार) सकाळ**


## पोलीस स्टेशन अरोली नागपूर ग्रामीणच्या वतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

पोलीस स्टेशन अरोली नागपूर ग्रामीणच्या वतीने दि. १३/०९/२०२४ रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

मा. श्री. हर्ष पोद्दार सा., पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतुन मा. श्री रमेश धुमाळ सा., अपर पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रा. तसेच मा. श्री रमेश बरकते सा. उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनात पोलीस पाटील आणि गणपती मंडळ यांच्या सहकार्यातुन, गणपती महोत्सव आणि ईद मिलाद उन नबी निमीत्त भव्य रक्तदान शिबीर पोलीस स्टेशन अरोलीच्या वतीने पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. स्नेहल राऊत, पोउपनि श्री सोनवने, तसेच समस्त पोलीस अंमलदार यांनी अथक परिश्रम करून शिबीर यशस्वी केले. त्यादरम्यान शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूरचे समाजसेवा अधीक्षक श्री किशोर धर्माळे, सचिन दोड यांच्या पथकाने १०० रक्त दात्यांचे रक्त संकलीत केले. यावेळी अरोली युको बँकच्या शाखा प्रबंधक श्रीमती सीमा चौधरी तसेच अरोली ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. भूरे, प्रशांत भूरे तसेच जि. प. सदस्य श्री. योगेश देशमुख, धानोली येथील सरपंच अमोल नरूले यांनी शिबीराला भेट दिली.

यामध्ये ठाणेदार स्नेहल राऊत यांनी सर्व रक्तदात्यांचे मन: पर्वक आभार मानले आहे. तसेच गणेशोत्सव आणि ईद मिलाद उन नबी हे दोन्ही सण शांततेत व कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता, हर्ष उल्हासात पार पाडण्याबाबत आवाहन केले आहे.

त्याचप्रमाणे शिबीरादरम्यान समर्थ रामदास हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर परिसर स्वच्छता वर नाटिका सादर केली.




## प्राणांतिक अपघात

पोस्टे खापा अंतर्गत मौजा खैरी पंजाब शिवार, पारशिवनी ते खापा सिमेंट रोड येथे दिनांक १५/०८/२०२४ चे दुपारी ०४/०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– सुनिल दिलीप नेताम, वय २८ वर्ष, रा. गुमगाव माईन खापा** आणि निखील राजेश कठोते, प्रविण पदम रौतेल यांच्यासह रामटेक येथुन खापा येथे परत येत असताना आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल हि भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणाने चालवल्याने त्याचे मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. यातील जखमी नामे– **प्रविण पदम रौतेल, वय २५ वर्ष रा. गुमगाव माईन** हा उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपूर येथे मरण पावला. यातील आरोपी मोटरसायकल चालक स्वत:चे व मोटरसायकलचे मागे बसलेले निखील राजेश कठोते याचे जख्मी होण्यास तसेच मागे बसलेला **मृतक नामे– प्रविण पदम रौतेल, वय २५ वर्ष रा. गुमगाव माईन** याचे उपचारा दरम्यान मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोहवा नरेश जियालाल गाते पोस्टे खापा यांचे रीपोर्ट वरून दिनांक १३/०९/२०२४ रोजी पोस्टे खापा येथे आरोपीविरूद्ध कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१) बी एन एस २०२३ सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर